मी सी/12530 राजेंद्र शंकर राऊत, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे शिक्षाबंदी असुन मा० जिल्हा न्यायाधीश व अति सत्र न्यायाधीश, नाशिक यांनी मला सुरगाणा पोलीस स्टेशन गु.र.क्र. 54/2013, सेशन केस क्र. 29/2014 कलम 302 भा०दं० वि. अन्वये दोषी धरून दि. 06/02/2020 रोजी जन्मठेपेची शिक्षा दिलेली असुन सदरची शिक्षा मी कारागृहीन नियम व अटीच्या अधीन राहुन भोगत आहे...

"Me Holistic Center" मार्फत कारागृहामध्ये भगवद्गीतेवर आधारित सत्र घेतले जात होते. श्रीमती मंजुश्री राठी मॅडम या भगवद्गीतेमधील श्लोकांच्या माध्यमातून बंद्यांच्या मनामधील नकारात्मकतेसह बंद्यांना पडलेल्या असंख्य प्रश्नांची उत्तरे देऊन बंद्यांना जीवनाविषयी सकारात्मक दृष्टीकोन यावा याच दिशेने घेऊन जाण्याचे काम मॅडम अगदी सहज करत होत्या. जीवन, संघर्ष, नियती, प्रारब्ध, संचित, कर्म, कर्तव्य या आणि अशा अनेक म्हणजे कठीण समजल्या जाणाऱ्या विषयांना मॅडम अगदी सुलभ आणि सोप्या पद्धतीने बंद्यांना समजावून सांगत असत. त्यामुळेच बंद्यांच्या मनात उत्पन्न होणाऱ्या असंख्य प्रश्नांची उत्तरे मिळत असत, बंद्यांना जीवनाची एक नवी दिशा मिळत असे. ध्यान, साधना, प्राणायाम यासह आध्यात्मिक विषयांचे मॅडम अधिक सुलभ विश्लेषण करून सांगत असत. त्यामुळेच अत्यंत हतबल अशा नैराश्याच्या अवस्थेतही बंदी स्वतःला स्थिर ठेवू शकले. मी सुद्धा तणावातच होतो पण आज केवळ मॅडम मुळे मी स्थिर आहे, त्यासाठी मॅडमचे मनापासुन खुप खुप धन्यवाद...

मी एका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेवर प्राथमिक शिक्षक म्हणुन कार्यरत होतो. माझे लग्न झाले होते. लग्नानंतर 5 महिन्यातच माझी पत्नी (प्रिया) मला कायमचं सोडुन गेली... मी आध्यात्मिक वारसा असलेला अत्यंत हळवा, अत्यंत भावनाशील मुलगा होतो. माझ्या लग्नानंतर मी माझ्या पत्नीसह वैवाहिक आयुष्य अत्यंत आनंदात जगत होतो. दिवाळी जवळ आल्याने मी माझ्या पत्नीसोबत शॉपिंगसाठी नाशिकला आलो होतो. दिवसभर शॉपींग करून रात्री आम्ही आमच्या मोटार सायकलवरून सुरगाणा येथे निघालो दिवसभर आम्ही बरीच शॉपिंग केली होती. जवळपास 9:00 ते 9:30 वाजेच्या दरम्यान आम्ही चिरई घाटात पोहचलो होतो. आमची रूम जवळच होती. पण चिरई घाटातच आम्हाला काही अनोळखी लोकांनी अडवले